## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

बाबा आहेत जवळ माझ्या मनी ध्यानी
स्मरण आहे मला सतत पदोपदी
स्मरण विरेनाही क्षणही ॥ धृ.॥

बोलते दिवस दिवस मी बाबांशी
आहे संवाद जरी एकतर्फी
बाबा का नाही बोलत माझ्याशी
जरी आहेत दोष , सांगा हो तत्परी
आहे हो मी तुमची बाहुली ॥ 1 ॥

कधी भारे हात माथी फिरी
कधी तर पहुडे मांडीवरी
बाबा खेळ खेळती माझ्या मनी
येते नयनी पाणी कंठही दाटूनी
आहे बाबा तुमची मी वेडी ॥ 2 ॥

बसता अभ्यासाला मी घेऊनी
म्हणतात बाळा गोड धुन करी
सर्वस्वही त्यांना अर्पूनी
कशी तुमच्यापासूनी बाबा मी वेगळी
घ्या हो रूप मला सामावूनी ॥3॥

★★★★★